# मेट्रो-३ च्या २२ स्थानकांच्या नामफलक हक्कासाठी निविदा मागवल्या

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या २२ स्थानकांच्या नामफलकाचे हक्क प्रदान करणासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमटेडने विविध कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. या निविदांना १७ जुलैपर्यंत प्रतिसाद द्यावा, असे आवाहन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमटेडने केले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गाची लांबी ३३.५ किमी आहे. या मार्गिकेचे कारशेडचे काम आरे येथे सुरू असून मेट्रो डब्यांची चाचणी सध्या सुरू आहे. मेट्रो ३ चे भुयारीकरण पूर्ण झाले असून स्थानकांचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहण्यापेक्षा मेट्रो कार्यचलनाच्या महसूल वाढीकडेही लक्ष देण्यासाठी मेट्रो स्थानकांच्या नावाचे ब्रँडिंग आणि नावाचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी विविध कंपन्यांसाठी निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. यापूर्वी चर्चगेट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, सिद्धिविनायक, वांद्रे-कुर्ला संकुल या स्थानकांसाठी कंपन्यांची नावे ठरवण्यात आली आहेत. त्यानुसार एलआयसी चर्चगेट व एलआयसी हुतात्मा चौक, कोटक महिंद्रा बँक लिमिटेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, आयसीआयसीआय लोंबार्ड सिद्धिविनायक स्थानक



व कोटक महिंद्रा बँक लिमिटेड बीकेसी या स्थानकांची नावे अंतिम करण्यात आली आहेत. एकूण २६ मेट्रो स्थानकांपैकी २२ स्थानकांच्या नावाचे हक्क कंपन्यांना देण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत.

यापूर्वीही वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो १ व दहिसर ते डी. एन. नगर मेट्रो २ अ, आणि दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व या मेट्रोमध्ये काही स्थानकांना ब्रँडिंग करण्यात आले आहे. जाहिरातीतून महसूल वाढीसाठी एमएमआरसीएकडून हे प्रयत्न करण्यात येत आहेत. याअंतर्गत ५ वर्षांचा परवाना कंपन्यांना मिळणार असून विविध मार्गदर्शक फलक, तसेच स्थानकावर काही जागा कंपन्यांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. मेट्रो ३ दरम्यान आरे कॉलनी, सिप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ टर्मिनल २, सहार रोड, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल १, सांताक्रुझ, विद्यानगरी, बीकेसी, धारावी, शितलादेवी मंदिर, दादर, सिद्धिविनायक मंदिर, वरळी, आचार्य अत्रे चौक, वरळी विज्ञान केंद्र, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, ग्रँट रोड, गिरगाव, काळबादेवी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, हुतात्मा चौक, चर्चगेट, विधानभवन, कफ परेड या २२ स्थानकांसाठी ब्रँडिंग करण्यात येणार आहे.